**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **२९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत जाहीर; 15 महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव.**
2. **नागपूर महापालिकेचे महापौर पद सर्वसाधारण महिला गटासाठी तर अकोला आणि चंद्रपूरचं महापौरपद मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित.**
3. **पाच नवीन ग्रामपंचायतींसह बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची एकूण संख्या ८७५ वर.**
4. **गडचिरोली आणि चंद्रपूर दौऱ्यात राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी साधला नक्षलपीडित कुटुंबांशी संवाद.**

**--------------------------------**

महापौर आरक्षण/ राज्य

राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौर पदाची आरक्षणाची सोडत नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. पुढील अडीच वर्षांसाठी ही सोडत काढण्यात आली असून 29 महापालिकांपैकी 15 महापालिका विविध प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. राज्यातील 29 महानगरपालिकांपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकच पद आरक्षित होत आहे.नियमातील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी पद देय होत नाही. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी 3 पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी 2 पदे अनुसूचित जाती (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झालेली आहेत. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी 8 पदे आरक्षित झाली असून, त्यापैकी 4 पदे नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) या प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत.

उर्वरित 17 महानगर पालिकांमधून सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी 9 पदे येत असून, त्यापैकी 8 पदे खुला (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. दरम्यान पुणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई येथील महापौर पद सर्वसाधारण गटातील महिलांसाठी आरक्षित आहे. तर छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, पिंपरी

चिंचवड महापालिकांतील महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी ठेवण्यात आले आहे.

---------------------------------

महापौर आरक्षण/ विदर्भ

राज्यातील महापालिकांच्या महापौर पदासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. विदर्भातील नागपूर, अकोला, अमरावती आणि चंद्रपूर या प्रमुख महापालिकांमध्ये आरक्षणामुळे सत्तासमीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत. उपराजधानी नागपूर महापालिकेचे महापौर पद सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी राखीव ठेवण्यात आलं आहे. अकोला आणि चंद्रपूर महापालिकेतील महापौर पद मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाली आहेत. २०१३ पासून चंद्रपूर महानगर पालिका अस्तित्वात आल्यापासून आतापर्यंत चार महिलांना महापौर होण्याची संधी मिळाली असून यंदा देखील पाचव्यांदा महिलांना महापौर होण्याची संधी मिळणार आहे. चंद्रपूर महानगर पालिकेत एकूण ६६ जागा आहेत. यामध्ये काँग्रेस २७, मित्रपक्ष जनविकास सेना ३, भाजप २३, शिवसेना (ऊबाठा) ६, वंचित आघाडी २, बसपा १, शिवसेना १, तर अपक्ष २ असे संख्याबळ आहे. दरम्यान, अमरावती महापालिकेचे महापौर पद सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गासाठी राखीव आहे.

---------------------------------

विजय वडेट्टीवार

चंद्रपूर महापालिकेत पाच वर्ष काँग्रेसचाच महापौर बसेल, असा ठाम दावा काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. महापौर आणि गटनेत्याचा अंतिम निर्णय काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

***(होल्ड बाईट - वडेट्टीवार - २१ सेकंद)***

***काँग्रेसचाच महापौर चंद्रपूर महानगरपालिकेवर बसेल ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. आम्ही सर्व अधिकार प्रदेशाध्यक्षांच्याकडे दिलेला आहे. प्रदेशाध्यक्षांनी तो निर्णय घ्यायचा आहे. कोणाला महापौर करायचं, कोणाला उपमहापौर करायचं हे सर्व निर्णय मी सांगितलं आहे की प्रदेशाध्यक्ष म्हणून तुम्ही ते निर्णय घ्या आणि महानगरपालिकेमध्ये सत्ता आपल्याला बसवायची आहे.***

महापौर पदाच्या आरक्षण प्रक्रियेत पारदर्शकता नसून भाजपच्या निवडून आलेल्या नगरसेवकांनुसार आरक्षण “फिक्सिंग” पद्धतीने झाल्याचा गंभीर आरोप वडेट्टीवार

यांनी केला. चंद्रपुरात आवश्यक संख्याबळ असून शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कॉंग्रेससोबत सत्तेत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

---------------------------------

प्रजासत्ताक दिना मुख्य शासकीय समारंभ

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी सव्वा नऊ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावं, यासाठी या दिवशी सकाळी साडे आठ ते दहा या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजवंदन समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी साडे आठ च्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा, असं राजशिष्टाचार विभागामार्फत परिपत्रकाद्वारे कळवण्यात आलं आहे. दरम्यान नागपुरात भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता कस्तुरचंद पार्क येथे राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. या सोहळ्यात नागपूर महानगरपालिकेच्या शाळांतील ११० विद्यार्थी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर करणार असून संजयनगर आणि विवेकानंदनगर हिंदी माध्यमिक शाळेचे विद्यार्थी पथसंचलनात सहभागी होणार आहेत.

---------------------------------

नॅशनल हेल्पलाईन

तृतीयपंथीय व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण आणि समस्या निवारणासाठी केंद्र शासनाने नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर उपलब्ध करून दिले असून, आकस्मिक मदत आणि तक्रारींसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ सुरू करण्यात आला आहे. तृतीयपंथीय समुदायाने अडचणी, तक्रारी किंवा आपत्कालीन मदतीसाठी या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असं आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केलं आहे.

---------------------------------

पाच नवीन ग्रामपंचायती

बुलढाणा जिल्ह्यात पाच नवीन ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली असून, आता जिल्ह्यातल्या ग्रामपंचायतींची संख्या ८७५ झाली आहे. शासन राजपत्रात

यासंदर्भातली अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजने अंतर्गत चिखली तालुक्यातल्या ग्रामपंचायत अंचरवाडीचे विभाजन करून वसंतनगर, आणि मेहकर तालुक्यातल्या ग्रामपंचायत-विश्विचं विभाजनकरून राजगड इथं नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण निकषांअंतर्गत लोणार तालुक्यातल्या पारडाचं विभाजन करून धायफळ, जळगाव जामोद तालुक्यातल्या रसूलपूरचं विभाजन करून वायाळ, तसंच सुनगावचं विभाजन करून चालठाणा खुर्द इथं नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या आहेत.

--------------------------------

राजेश अग्रवाल

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांच्या दौऱ्यात नक्षलपीडित कुटुंबे, गरजू रुग्ण, विद्यार्थी आणि दिव्यांगांच्या सक्षमीकरणावर भर दिला. गडचिरोलीत नक्षलवादी हिंसाचारात बाधित कुटुंबांतील २९ तरुणांना शासन सेवेत सामावून घेतल्यानंतर त्यांच्याशी संवाद साधत पुढील शिक्षण सुरू ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाला भेट देत गरजू रुग्णांना वेळेत आणि पारदर्शकरित्या मदत मिळावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. गोंडवाना विद्यापीठातील C ट्रिपल IT केंद्राला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत रोजगारक्षम कौशल्यांचा लाभ घेण्याचं आवाहन देखील अग्रवाल यांनी केलं. चंद्रपूर जिल्ह्यात आनंदवन येथे भेट देत कुष्ठरुग्ण आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून तेथील उपक्रमांचं मुख्य सचिवांनी कौतुक केलं. त्याचप्रमाणे दिव्यांग कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र, प्रशिक्षण विभाग, कार्यशाळा आणि रुग्णालयाची पाहणी करत सामाजिक समावेशनाच्या कार्याला प्रोत्साहन दिलं.

--------------------------------

महावितरण

कृषी वीज वाहिन्यांच्या सौर ऊर्जीकरणात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महावितरणला ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या ‘एडिकॉन-2026’ राष्ट्रीय परिषदेत पुरस्काराने गौरविण्यात आलं. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी हा

पुरस्कार स्वीकारला. मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अंतर्गत आतापर्यंत १,९८५ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून ८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळत आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटींची गुंतवणूक, ७० हजार ग्रामीण रोजगार निर्मिती आणि महावितरणच्या वीजखरेदीत दरवर्षी सुमारे १० हजार कोटींची बचत होणार आहे.

---------------------------------

पी.व्ही सिंधू

पी व्ही सिंधू आणि लक्ष्य सेन या दोघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेननं पुरुष एकेरी गटात हाँगकाँग चीनच्या जेसन गुनावान याला २१-१०, २१-११ असं नमवलं तर महिला एकेरीमध्ये दोन वेळच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या सिंधूनं डेन्मार्कच्या होजमार्क कजेरफेल्ड्ट चा २१-१९, २१-१८ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा मुकाबला आता चीनची चेन यू फेई हिच्याशी होणार आहे.

---------------------------------

हस्तांतर

भंडारा जिल्ह्यातील नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे वैद्यकीय शिक्षण आणि रुग्णसेवा विभाग जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून हस्तांतरीत होणार आहे. सध्या १०० विद्यार्थी प्रवेश आणि ४३० खाटांच्या क्षमतेसह महाविद्यालय सुरु असून, तात्पुरत्या स्वरुपात नविन स्त्री रुग्णालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सुविधांचा वापर सुरू आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षणाची संधी उपलब्ध होईल.

---------------------------------

हवामान

विदर्भात सातत्याने किमान तापमानात वाढ होते आहे. आज गोंदिया जिल्ह्यात १२ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. गोंदिया पाठोपाठ नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात 14 पूर्णांक २ अंश सेल्सिअस तर वर्धा इथं 14 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं.

---------------------------------